**मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**सायबर गुन्हे कक्ष**

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओस्तवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट :-१११/२०२२** **दिनांक – २३/०४/२०२२**

# फेक Instagram IDद्वारे मुलीला धमकावणा-या इसमास पकडण्यात सायबर गुन्हे शाखेला यश......

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरा रोड पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारी मुलगी वय वर्षे - १९ वर्षे हीला cinndivv_ हया Instagram आयडी वरुन तिचे वैयक्तीक फोटो तिच्या मित्र-मैत्रीणीमध्ये पसरवुन तिची बदनामी करीत होता. तसेच तिच्याकडे अश्लिल फोटोची मागणी करीत असल्याबाबत सायबर गुन्हे शाखा आवक अर्ज क्रमांक ४२९-बी/२०२२ दिनांक १९/०४/२०२२ अन्वये तक्रारी अर्ज सायबर गुन्हे शाखेकडे चौकशी कामी प्राप्त झाला होता.

सदर तक्रारी अर्जावर सायबर गुन्हे शाखेकडून तांत्रीक चौकशी करुन संशयित नामे **अनिकेत ..... वय – २१ वर्षे, रा. सिल्वर पार्क, मिरारोड (पुर्व) ता.जि.ठाणे** याला चौकशीकामी बोलावून त्याचेकडे चौकशी केली असता सदर व्यक्ती वापरत असलेल्या मोबाईलची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी दिलेला cinndivv_ हा Instagram आयडी मिळून आला. तसेच प्राप्त तांत्रीक माहीतीमध्ये db0194168@gmail.com व संशयित याचे मोबाईलमध्ये मिळून आलेला आयडीची पडताळणी केली असता सदर ईमेल आयडी सारखाच असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशा प्रकारे नमुद संशयित याने सदरचा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमुद तक्रारदार मुलगी हीने दिलेल्या तक्रारीवरुन **मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १७५/२०२२ भा.दं.वि.सं. कायदा कलम ३५४ (ड),५०६ सह माहिती तंत्रज्ञात अधिनीयम कलम ६६ (सी) अन्वये दिनांक २२/०४/२०२२ रोजी** गुन्हा नोंद करण्यात आला असुन वर नमुद इसमास अटक करण्यात आली असुन मिरारोड पोलीस ठाणे येथे पुढील तपास सुरु आहे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे इन्टाग्राम अथवा कोणत्याही सोशल मिडीयावर अश्लिल फोटोस व्हायरल/प्रसारीत करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजिकच्या पोलीस ठाण्यात अथवा सायबर गुन्हे शाखेस संपर्क साधावा.**

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,पोलीस अंमलदार /१२०९५ इलग,पोलीस अंमलदार/१२०९५ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३१०४ पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----oooo----